श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## ई–निविदा

## अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) पध्दतीने खरेदी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई यांच्याकडून राबविण्यात येणाऱ्या "श्रीसिध्दिविनायक पुस्तकपेढी योजना" या योजनेतंर्गत ११वी ते १५वी या इयत्तेत कला, वाणिज्य व विज्ञान या शाखेत शिक्षण घेत असलेल्या महाराष्ट्रातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वैयक्तीक व महाविद्यालय तसेच शैक्षणिक संस्थांमार्फत मोफत क्रमिक पुस्तकांचे वाटप करण्यात येते. या योजनेतंर्गत कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक मंडळाची तसेच पदवीच्या अभ्यासक्रमासाठी संबंधित विद्यापीठांची क्रमिक पुस्तके पुरविण्यासाठी, टक्केवारीची सवलत देणाऱ्या पुस्तक विक्रेत्यांकडून अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) मागविण्यात येत आहेत. तसेच निविदा अर्ज, निविदेच्या अटी व शर्ती, तांत्रिक निविदा लिफाफातंर्गत सादर करावयाची कागदपत्रे, हमीपत्र व आर्थिक निविदा लिफाफा नमूना इ. न्यासाची अधिकृत वेबसाईट **www.siddhivinayak.org** आणि शासन ई–निविदा संकेतस्थळ **www.mahatenders.gov.in** वर उपलब्ध आहेत.

| निविदा संदर्भ क्र. | निविदा तपशील | निविदेची किंमत/ शुल्क व बयाना रक्कम |
|---|---|---|
| पुस्तकपेढी –१ | कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक मंडळाची तसेच पदवीच्या अभ्यासक्रमासाठी संबंधित विद्यापीठांच्या क्रमिक पुस्तकांचा पुरवठा | निविदेची किंमत/ शुल्क – रू.३,००० <br> बयाना रक्कम – रू. ५०,०००/– |

- ई–निविदा प्रसिध्दीचा दिनांक –दि. **३ एप्रिल २०१८**
- निविदापूर्व बैठक दिनांक, वेळ व स्थळ – दि. **१० एप्रिल २०१८** , दुपारी ३.०० वा. ३ रा मजला, न्यास समिती कक्ष.
- ई–निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ – दि. **२१अप्रिल २०१८** , दुपारी १.०० वा. पर्यंत.
- तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक, वेळ व स्थळ – दि.**२३ एप्रिल २०१८** , दुपारी २.०० वा., ३ रा मजला, न्यास समिती कक्ष.
- मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक, वेळ व स्थळ –दि.**२३ एप्रिल २०१८**,दुपारी ४.०० वा.,३ रा मजला, न्यास समिती कक्ष.
- दि. **४ एप्रिल २०१८** पासून शासनाच्या संकेतस्थळावर निविदा कागदपत्रे डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहेत.
- निविदेची किंमत/ शुल्क ना परतावा स्वरुपाचे असेल.
- **ई – निविदेसाठी डिजीटल सिग्नेचर प्राप्त करणे आवश्यक असेल.**

सही/–
(संजीव पाटील)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## अटी व शर्ती

१. निविदेसोबत अपलोड करावयाचा मूळ निविदा अर्ज, तांत्रिक निविदा लिफाफा, हमीपत्र व आर्थिक निविदा लिफाफ्याचे नमुने सोबत दिले आहेत.

२. निविदा अपलोड करतेवेळी निविदेची किंमत/शुल्क रू. ३०००/– व बयाना रक्कम रू. ५०,०००/– ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फतच जमा करावी लागेल. बयाना रकमेवर व्याज अनुज्ञेय होणार नाही.

३. ऑनलाईन इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. बॅक किंवा इतर इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. MOPS (Multiple Option Payment System) चा वापर करावा.

४. निविदा मंजूर झाल्यानंतर ८ दिवसाच्या आत निविदाधारकाने ठेक्याच्या कालावधीमध्ये पुरवठा करावयाच्या पुस्तकापोटी रू. २ लक्ष एवढया रकमेची बॅक गॅरेंटी न्यासास सादर करावी. न्यासाकडे जमा असलेली बयाना रक्कम वजा करुन उर्वरीत रकमेकरीता बॅक गॅरेंटी स्विकारण्यात येईल. बॅक गॅरेंटी रा ट्रीयकृत वा अनुसूचित बॅकेची द्यावी लागेल.

५. ई–निविदेसोबत रा ट्रीयकृत वा अनुसूचित बॅकेचा रू. १० लक्ष एवढा रकमेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) अपलोड करावा लागेल.

६. ई–निविदा अपलोड करतेवेळी ऑनलाईन बॅकींगमार्फत न्यासास जमा केलेल्या निविदेची किंमत/शुल्क व बयाना रक्कमेबाबतची पावती प्रत अपलोड करावी.

७. पूर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत अपलोड करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे. मुदतीत न आलेल्या तसेच अपूर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

८. ई–निविदेसोबत तांत्रिक निविदा लिफाफ्यात नमूद माहिती व त्यापृ ट्यर्थची कागदपत्रे, हमीपत्र, प्राधीकार पत्र व आर्थिक निविदा लिफाफा, अपलोड करणे आवश्यक आहे. त्यानंतर मूळ निविदा उघडण्यात येईल.

**९. पुस्तके पुरवठयाचा कालावधी हा प्रथम पुरवठा आदेश दिनांका पासून ते ३१ मार्च २०१९ अखेर पर्यंत वैध राहील.**

१०. पुस्तके पुरवठादारास/एजन्सीस स्व:खर्चाने महाविद्यालय/ शैक्षणिक संस्थांकडे पुस्तके पोहोच करावी लागतील.

११. न्यासाकडून पुस्तक पुरवठा आदेश दिल्यापासून ७ दिवसाच्या आत पुस्तके उपलब्ध करून घेऊन, पुढील ७ दिवसात महाविद्यालय/शैक्षणिक संस्थांकडे पोहोच करणे बंधनकारक राहील.

१२. न्यासाच्या पुरवठा आदेशानुसार शैक्षणिक संस्थांना सर्व पुस्तके उपलब्ध करून देणे बंधनकारक असेल.

१३. संस्थेने मागणी केलेल्या प्रकाशकाची पुस्तके उपलब्ध नसल्यास संस्थेने शिफारस केलेल्या अन्य प्रकाशनाची पुस्तके न्यासाच्या पूर्व परवानगीने महाविद्यालय/शैक्षणिक संस्थेस उपलब्ध करून देता येतील. न्यासाच्या पूर्व परवानगीशिवाय परस्पर अन्य प्रकाशनाच्या पुस्तकाचे वितरण केल्यास त्याबाबतचे प्रदान न्यासाकडून केले जाणार नाही.

१४. न्यासाकडे पुस्तकाची देयके सादर करताना देयकातील नमुद पुस्तके ही पुरवठा आदेशामध्ये न्यासाने नमूद केलेल्या अनुक्रमानुसार व संख्येनुसार असावीत व पुस्तकाची मुळ किंमत त्यावरील सवलत वजा जाता येणारी किंमत दर्शविणे आवश्यक राहील. अशा पध्दतीने सादर केलेल्या बिलांसदर्भात प्रदानाच्या कार्यवाहीसाठी विलंब झाल्यास त्यासाठी न्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१५. न्यासाचे ज्या क्रमाने पुरवठा आदेश आहेत, त्याच क्रमाने **शैक्षणिक** संस्थांना पुस्तके देणे, वितरण करणे बंधनकारक असेल. पुस्तक विक्रेत्याने स्व:ताच्या मर्जीनुसार बदल करू नये, अथवा पुस्तक वितरणाचा क्रम ठरवू नये.

१६. फाटकी, वाळवी लागलेली अथवा बांधणी सुटलेली पुस्तके वितरण केल्याचे आढळल्यास त्या बदली नविन पुस्तके दिली जाईपर्यंत त्या पुस्तकांचे प्रदान केले जाणार नाही.

१७. पुस्तक विक्रेत्याने देयकासोबत खालील बाबी सादर करणे क्रमाप्राप्त असेल त्याशिवाय देयकाचे प्रदान केले जाणार नाही.

अ) संस्थांना (महाविद्यालय व **शैक्षणिक**संस्था इ.) पुस्तके प्राप्त झाल्याबाबत संस्थेची सविस्तर पोच.

ब) महाविद्यालय/शैक्षणिक संस्थेने पुस्तके स्वत: नेल्यास पुस्तके घेऊन जाणाऱ्या व्यक्तीची ओळखपत्राची झेरॉक्स प्रत.

१८. न्यासाला कोणतीही कारणे न देता निविदा स्विकारण्याचा वा नाकारण्याचा व रद्द करण्याचा अधिकार असेल.

१९. उपरोक्त अटी व शर्तीमध्ये काही बदल, सुधारणा करणेचा वा जादा अटी व शर्ती विहित करण्याचा तसेच करार रद्द करण्याचा अधिकार न्यास प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. आपल्या कोणत्याही अटी न्यासावर बंधनकारक असणार नाहीत.

२०. निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांत समक्ष येवून स्टॅपपेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक राहील. परंतु अशाप्रकारे करारनामा करून दिला नाही अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास निविदाधारकाने सादर केलेली निविदा न्यासाच अटी व शर्तीनुसार करारनामा म्हणून ग्राहय धरण्यात येईल. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही. निविदेतील अटी व शर्ती कराराचा भाग असतील.

२१. ज्या दिवशी निविदा उघडण्यात येणार आहेत त्या दिवशी ई–निविदेद्वारे अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करणे बंधनकारक असेल.

२२. **अभ्यासक्रम बदलला गेल्यास पुरवठादाराने नवीन पुस्तके उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.**

२३. महाविद्यालय/शैक्षणिक संस्थेच्या **प्राप्त मागणीनुसार त्या त्या प्रकाशनाची पुस्तके पाठविणे पुरवठाधाराकास बंधनकारक राहील.**

२४. संकेतस्थळाच्या माहितीकरिता टोल फ्री क्र. १८००–३०७०–२२३२, टोल फ्री मो. क्र. ७८७८० ०७९७२, ७८७८० ०७९७२

**(संजीव पाटील)**
**कार्यकारी अधिकारी**

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## तांत्रिक निविदा लिफाफा (Technical Bid)

## निविदाकाराने स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे

| अ.क्र. | ऑनलाईन सादर करावयाची कागदपत्रे |
|---|---|
| ०१ | निविदा किंमत/शुल्क ऑन लाईन भरल्याची पावती |
| ०२ | ऑन लाईन बयाना रक्कम भरल्याची पावती |
| ०३ | राष्ट्रीयकृत बॅंकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) |
| ०४ | स्थानिक प्राधीकरणाने दिलेला व्यवसाय परवाना क्रमांक |
| ०५ | व्हॅट/ टिन क्रमांक / जीएसटी लागू असल्यास नोंदणीची प्रत |
| ०६ | आयकर नोंदणी पॅन क्रमांक |
| ०७ | मागील ३ **वर्षात** आयकर विभागाला सादर केलेली विवरणपत्रे (सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७) |
| ०८ | सनदी लेखा परिक्षकाने प्रमाणित केलेली मागील ३ **वर्षात** उलाढाल प्रमाणपत्र (सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७) |
| ०९ | शालेय/ महाविद्यालयीन पुस्तके विक्री व वितरणाचा अनुभव |
| १० | हमीपत्र |
| ११ | निविदा उघडण्याच्यावेळी मालक /भागीदार या व्यतिरिक्त अन्य प्रतिनिधी पाठविल्यास त्याच्या नावाचे प्राधीकार पत्र. |

**निविदाधारकाची सही व शिक्का**

# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com


## मूळ निविदा अर्ज

निविदामध्ये खालील बाबी अंतर्भुत करण्यात याव्यात.

१) एजन्सीचे नांव : ____________________

२) पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता : ____________________

____________________

____________________

३) दूरध्वनी क्रमांक : ____________________

ऑफीस : ____________________

दुकान : ____________________

निवास : ____________________

मोबाईल क्रमांक : ____________________

फॅक्स क्रमांक : ____________________

ई – मेल : ____________________

४) संपर्कासाठी व्यक्तीचे नांव : ____________________

दूरध्वनी क्रमांक : ____________________

५) मालकाचे / भागीदारांची नावे : १)____________________

२)____________________

३)____________________

६) मोबाईल क्रमांक : ____________________

७) निविदा किंमत/शुल्क : ____________________

८) बयाना रक्कम : ____________________

निविदाधारकाची सही व शिक्का

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

-15-

# हमीपत्र

**प्रति,**
कार्यकारी अधिकारी,
श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,
प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

मी/आम्ही ———————————————————— खालील निम्न स्वाक्षरीकार याद्वारे घोि ात करतो की,

१. मी/आम्ही निविदेची कागदपत्रे, अटी व र्ती, अन्य बाबी तपासून त्याबाबत खात्री केली असून या वि ायी आमची कोणतीही ंका नाही.

२. निविदा अटी व र्तीनुसार पुस्तकांचा पुरवठा विहित कालावधीत करेन.

३. आम्ही याद्वारे हमी देतो की, ाासकीय / निमशासकीय / सार्वजनिक उपक्रम यांचेकडून आमच्या एजन्सीज पुस्तक पुरवठा करण्यास प्रतिबंध घातलेला नाही.

४. आम्हास माहित आहे की, निविदा स्विकृत करण्यासंदर्भात न्यासास संपूर्ण अधिकार आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार न्यासास आहे.

५. निविदेसोबतची सर्व कागदपत्रे आम्ही काळजीपूर्वक वाचली असून निविदेतील अटी व शर्ती, अन्य बाबी आम्हांस मान्य असून त्या बंधनकारक आहेत.

**निविदाधारकाची सही व शिक्का**

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## आर्थिक निविदा लिफाफा (Commercial Bid)

सदर लिफाफ्यात खालीलप्रमाणे माहिती भरून ती अपलोड करण्यात यावी.

| अ.क्र. | विभाग | सवलतीची टक्केवारी |
|---|---|---|
| ०१ | महाराष्ट्र पाठ्यपुस्तक मंडळ | |
| ०२ | शिवाजी विद्यापीठ | |
| ०३ | अन्य शासकीय / निमशासकीय विद्यापीठे | |
| ०४ | अन्य खाजगी विद्यापीठे | |
| ०५ | संदर्भसाहित्य | |

निविदाकाराची सही